# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.01.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

- दावोसमध्ये पहिल्याच दिवशी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी 4 लाख 99 हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार
- छत्तीसगड आणि ओडिशामध्ये सुरक्षा दलांच्या कारवाईत 14 नक्षलवादी ठार
- दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा भाग म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी आज भाजपाच्या मतदान केंद्र कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आणि
- भारत-इंग्लंड क्रिकेट संघांदरम्यान वीस षटकांच्या मालिकेला आजपासून सुरुवात.

**दावोस**

दावोसमध्ये सुरू असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत काल पहिल्याच दिवशी महाराष्ट्राने 4 लाख 99 हजार 321 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले. यातून 92 हजारांपेक्षा जास्त रोजगारनिर्मिती होण्याची अपेक्षा आहे. जेएसडब्ल्यू समवेत 3 लाख कोटीं रुपयांचा करार काल करण्यात आला. पोलाद, नवीनीकरणीय ऊर्जा, पायाभूत सुविधा, सिमेंट, लिथियम-आयर्न बॅटरिज, अशा विविध क्षेत्रात हा करार करण्यात आला आहे. गडचिरोलीमध्ये संरक्षण, पोलाद आणि इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रासाठीचे प्रकल्प उभारण्यासाठी कल्याणी समूहासमवेत देखील काल करार झाला. या करारांमुळे महाराष्ट्राच्या विकासाला मोठी चालना मिळेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. उद्योगमंत्री उदय सामंत आणि अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**पीठासीन अधिकारी**

विधिमंडळाचं कामकाज सुरळीतपणे चालवण्याचा आणि सभागृहात गुणवत्तापूर्ण चर्चा घडवून आणण्याचा संकल्प काल अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत घेण्यात आला. पाटणा इथं आयोजित 85 व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेच्या समारोप सत्रात पाच ठराव संमत करण्यात आले.

**नक्षलवादी**

छत्तीसगड आणि ओडीशाच्या सीमेवर सुरक्षा दलांनी केलेल्या संयुक्त कारवाईत 14 नक्षलवादी ठार झाले. त्यात नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य जयराम उर्फ चलपती याचाही समावेश आहे. त्याच्यावर 1 कोटी रुपयांचं बक्षीस होतं. सुरक्षा दलांनी घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठाही जप्त केला आहे.

**अमितशहा-नक्षलवादी**

दरम्यान, सुरक्षा दलांनी केलेल्या या कामगिरीची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी प्रशंसा केली आहे. नक्षलमुक्त भारत निर्माण करण्याच्या दिशेने सुरक्षा दलांनी मिळवलेलं हे मोठे यश आहे अशी प्रतिक्रिया शहा यांनी समाज माध्यमांवरील संदेशात दिली आहे. सरकार आणि सुरक्षा दलांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे भारत नक्षलमुक्त होईल असा विश्वास त्यांनी या संदेशात व्यक्त केला आहे.
ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी स्पेशल ऑपरेशन ग्रुप अर्थात एस ओ जी ने केलेल्या या कारवाईबद्दल सुरक्षा दलांचं अभिनंदन केलं आहे. या कामगिरीचं कौतुक करत, एस ओ जी कर्मचाऱ्यांचा जोखीम भत्ता 8000 रुपयांवरून 25000 रुपये प्रति महिना करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

**भाजप पीएम**
दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा भाग म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी आज भाजपाच्या मतदान केंद्र कार्यकर्त्यांशी नमो ॲप्लिकेशनद्वारे संवाद साधणार आहेत. “मेरा बूथ सबसे मजबूत” हे या उपक्रमाचं घोषवाक्य आहे. या उपक्रमाअंतर्गत, दिल्लीतील 256 प्रभागांतील, 13 हजार 33 पक्षाचे खासदार, आमदार, मतदान केंद्रांवरील पक्ष कार्यकर्ते दृक-श्राव्य माध्यमातून पंतप्रधानांचा संदेश ऐकतील. त्यांपैकी काही कार्यकर्त्यांना पंतप्रधानांशी संवाद साधण्याची संधी मिळणार असल्याचं नमो ॲपचे राष्ट्रीय समन्वयक कुलजीत सिंह चहल यांनी सांगितलं.

**बेटी बचाओ**
मुलींची सुरक्षितता, शिक्षण आणि सक्षमीकरण यांसाठी राबवण्यात येणाऱ्या बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेची दशकपूर्ती आज होते आहे. त्यानिमित्त दिल्लीत एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून त्यात सशस्त्र दल, निमलष्करी दल, दिल्ली पोलिस, विद्यार्थिनी आणि अंगणवाडी सेविकांच्या महिला अधिकारी सहभागी होतील.

**सुकन्या**
याच बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानाचा भाग असलेल्या सुकन्या समृद्धी योजनेला देशात उत्तम प्रतिसाद मिळत असून या योजनेत आत्तापर्यंत चार कोटीहून अधिक खाती उघडण्यात आली आहेत. अर्थमंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, योजनेला 8 पूर्णांक 2 दशांश व्याजदर दिला जातो.

**रिव. तुर्की – आग**
वायव्य तुर्कीमधील स्की रिसॉर्ट इथल्या एका हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत किमान 66 जणांचा मृत्यू झाला आणि 51 जण जखमी झाले. अधिकाऱ्यांनी हॉटेलमधून अंदाजे 230 पाहुण्यांना बाहेर काढलं. तुर्कीचे गृहमंत्री अली येरलिकाया म्हणाले की, कार्तलकाया या पर्वताच्या माथ्यावर असलेल्या रिसॉर्टमधील 12 मजली ग्रँड कार्तल हॉटेलच्या रेस्टॉरंटमध्ये आग लागली. खबरदारी म्हणून जवळची इतर हॉटेल्स रिकामी करण्यात आलं आणि, पाहुण्यांना परिसरातील इतर निवासस्थानांमध्ये स्थलांतरित करण्यात आलं.

**वर्ल्ड बँक करार**
जम्मू आणि काश्मीरमधील दोन जलविद्युत प्रकल्पांवर भारत आणि पाकिस्तानमध्ये असलेल्या मतभेदांवर सिंधू पाणी करारांतर्गत निर्णय घेण्यास सक्षम असल्याचं जागतिक बँकेने नियुक्त केलेल्या तटस्थ तज्ज्ञाने जाहीर केलं आहे. या तज्ज्ञाने प्रकल्पांच्या आरेखनाविषयी असलेली चिंता विचारात घेण्यासाठी लवाद नेमण्याची

पाकिस्तानची विनंती फेटाळून लावली आहे. किशनगंगा आणि रॅटले जलविद्युत प्रकल्पांवरील चिंता विचारात घेण्यासाठी तटस्थ तज्ज्ञाची नियुक्ती करण्याची मागणी केली होती. तटस्थ तज्ज्ञाने जाहीर केलेल्या निवेदनात, काळजीपूर्वक आणि विश्लेषण केल्यानंतर मतभेदांच्या मुद्द्यांचा मुद्द्यांच्या गुण-दोषांवर निर्णय देण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. तर या प्रकल्पांशी निगडीत मतभेद सोडवण्याची क्षमता केवळ तटस्थ तज्ज्ञाकडे आहे, अशी भारताची सुसंगत आणि तत्वनिष्ठ भूमिका असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. तटस्थ तज्ज्ञाने दिलेला निर्णय भारताच्या भूमिकेला समर्थन देणारा आहे असं मंत्रालयानं जारी केलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे.

**शॉल्झ - करार**

भारत आणि अन्य  काही देशांसोबत मुक्त व्यापार करारांमध्ये प्रगती होण्याची आपल्याला आशा असल्याचं जर्मनीचे चान्सलर ओलाफ शोल्झ  यांनी म्हटलं आहे. दावोस इथं झालेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक बैठकीत ते बोलत होते. धोरणात्मक भागीदारी वाढविण्यासाठी आपण लवकरच भारताला भेट देणार असल्याचं युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांनी सांगितलं.

**ट्रम्प आदेश**

अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल पदभार स्वीकारल्यानंतर माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी मंजूर केलेली 78 धोरणे रद्द करणाऱ्या प्रशासकीय आदेशावर सही केली. यातील एका आदेशानुसार, अमेरिकेत बेकायदेशीरपणे तसंच कायदेशीरपणे परंतु तात्पुरत्या व्हिसावर वास्तव्य करणाऱ्या पर्यटक, विद्यार्थी आणि कर्मचारी, यांच्या नवजात बालकांना नागरिकत्व मिळणार नाही. संबंधित संस्थांना हा आदेश लागू करण्यासाठी तीस दिवसांचा अवधी देण्यात आला आहे. त्याव्यतिरिक्त, कोविड महासाथीची अयोग्य हाताळणी, तसेच चीनबाबत पक्षपाती धोरण राबवल्याचा ठपका ठेवत देशाला जागतिक आरोग्य संघटनेतून बाहेर पडण्याचे निर्देश दिले आहेत. पर्यावरण बदलाच्या पॅरीस हवामान करारातून बाहेर पडण्याच्या प्रकियेची सुरुवात करण्यासंदर्भातले निर्देश आदी प्रमुख धोरणांचा समावेश आहे.

**अमेरिका क्वाड**

अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी त्यांच्या क्वाड समपदस्थ अधिकाऱ्यांची भेट घेतली. यामध्ये भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, जपानचे ताकेशी इवाया आणि ऑस्ट्रेलियाचे पेनी वाँग यांचा समावेश होता. क्वाड ही भारत, ऑस्ट्रेलिया, जपान आणि अमेरिका यांची राजनैतिक संघटना आहे. त्याअंतर्गत खुल्या, स्थिर आणि समृद्ध इंडो-पॅसिफिक क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध आहे. रुबियो यांनी पदभार स्वीकारल्यानंतर लगेचच ही भेट घेतली. क्वाड देशांचे परराष्ट्र मंत्री, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधीसाठी अमेरिकेत उपस्थित होते. अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांनी मार्को रुबियो यांना परराष्ट्र सचिव म्हणून नियुक्त केले आहे.

**गडकरी-गोवा**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते अनेक महामार्ग प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करण्यात आलं. त्यांनी काही प्रकल्पांचं लोकार्पण केलं.  या प्रकल्पांमुळे राज्यातील नौकानयन पर्यटन आणि आयात-निर्यात क्षेत्राला चालना मिळेल असं गडकरी यावेळी बोलताना म्हणाले.  गोवा प्रदूषण आणि अपघातमुक्त करण्यासाठी गोवा सरकारने प्रयत्न करावेत असं  आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**जकार्ता- बॅडमिंटन**

इंडोनेशियात जकार्ता इथं सुरू असलेल्या इंडोनेशिया मास्टर्स सुपर-500 बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या सामन्यात आज भारताच्या पीव्ही सिंधूचा सामना व्हिएतनामच्या टीएल एन्गुयेनशी होणार आहे. तर, या स्पर्धेत, पुरुष एकेरीत भारताच्या किरण जॉर्जचा सामना कोरियाच्या जिओन ह्योक-जिनशी होईल तर लक्ष्य सेनचा सामना जपानच्या ताकुमा ओबायाशी याच्या विरुद्ध होईल. याच स्पर्धेत, काल महिला दुहेरीत भारताच्या तनिशा क्रेस्टो आणि अश्विनी पोनप्पा जोडीने थायलंडच्या जोडीचा पराभव केला. पुरुष दुहेरीत, सात्विक साइराज रांकि रेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीने तैवानच्या जोडीवर विजय मिळवला.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड पुरुष क्रिकेट संघादरम्यान टी-20 सामना मालिकेला आजपासून सुरुवात होत आहे. पाच सामन्यांच्या मालिकेतील आजचा पहिला सामना कोलकाता इथं ईडन गार्डन्स मैदानावर खेळला जाणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी 7 वाजता सामन्याची सुरुवात होईल.  संघाचं नेतृत्व सूर्यकुमार यादव करत आहे. 6 फेब्रूवारी पासून उभय संघादरम्यान तीन एक दिवसीय सामन्यांची मालिका सुरू होणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**